# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)


**दिनांक २०.०५.२०२६ बुधवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे तहसिल :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १९.०५.२०२६ चे २२.३७ वा. चे सुमारास, तहसिल पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, मेयो हॉस्पीटल सुरक्षा भिंतीजवळ, रामझुला समोर एक ईसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा एक ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद अरबाज उर्फ सानु उर्फ भांजा वल्द ईसराईल अन्सारी, वय ३२ वर्षे, रा. कमालबाबा दर्गाह जवळ, मोमीनपुरा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती अंदाजे ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसिल येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सदर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी नरेश वामनराव बरडे, वय ६० वर्षे, रा. फ्रेन्ड्स कॉलोनी, काटोल रोड, गिट्टीखदान, नागपूर यांचा डेव्हलपर्स व्यवसाय असुन, त्यांचे पोलीस ठाणे सदर हद्दीत, प्लॉट नं. १०२ विरेंद्र अपार्टमेंट, छावणी येथे मे. बरडे डेव्हलपर्स प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स नावाचे ऑफीस आहे. दिनांक १२.०९.२०१८ ते दिनांक १७.११.२०२० चे दरम्यान, आरोपी श्रीमती खैरूनिसा मोहम्मद सम्मद, रा. प्लॉट नं. १२, हॅरीटेज इंटेन, नॅशनल शाळेजवळ, सदर, नागपुर यांनी त्यांची बोखारा येथील शेती खसरा क्र. ५३/३ आराजी ०.८० हेक्टर आर ५३/५/२५ आरसि २०५ ही जमीन विक्री करायची आहे, असे सांगुन शेतजमीनीची मुळ मालक असल्याचे दर्शवुन, खोटे व बनावटी दस्तऐवज तयार केले. व फिर्यादीकडुन वेळोवेळी एकुण ३३,७१,०००/—रू. घेवुन फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून, फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे सदर येथे सपोनि. दिगांबर राठोड ८८३०८७०९०६ यांनी आरोपीविरूध्द कलम ४२० भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २०.०५.२०२५ चे १२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाचा नामे विक्की संजय काळे, वय ३२ वर्षे, रा. आठवा मैल, वाडी, नागपूर तसेच, त्याचे सोबत पेंटींग काम करणारा त्याचा मित्र किशोर शंकरलाल लोहे, वय ४२ वर्षे, रा. नरखेड, जि. नागपुर असे दोघे त्यांचे पॅशन प्रो मोटरसायकल क्र. एम.एच

४० एस.आर. ९२५४ ने पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत, प्रियदर्शिनी कॉलेजचे मागील गेट जवळ, शिवनगांव रोड येथुन पेंटींग ची घोडी घेवुन जात होते. त्यांचे गाडीसमोर टाटा डोझीयर ट्रक क्र. एम.एच. ४० सि.टी. १३९८ हा ट्रक एमआयडीसी कडुन शिवनगांव कडे जात होता. शिवनगांव कडुन एमआयडीसी कडे भारत पेट्रोलीयम चा एक टॅकर हा येत होता. टॅकरला साईड देण्याकरीता डोझीयर ट्रक चालकाने गाडी थांबविली व तो ट्रक रिव्हर्स घेत होता. परंतु ट्रक चालकाने कानात हेडफोन घातलेले होते. ट्रक मागे येत असतांना पॅशन प्रो मोटारसायकल चालकाने वारंवार गाडीचे हॉर्न वाजविले व आवाज दिले. परंतु, डोझीयर ट्रक चालकाने हेडफोन घातलेले असल्याने त्यास काहीही ऐकु न आल्याने त्याने त्याचा ट्रक निष्काळजीपणे व धोकादायकरित्या रिव्हर्स घेताना पॅशन प्रो गाडीवर ट्रक चढविला त्यामुळे मोटारसायलकल वरील दोघेही ट्रकचे चाकाखाली येवुन गंभीर जखमी झाले. डोझीयर ट्रक चालकाने पुन्हा ट्रक समोर घेवुन तेथुन निघुन गेला. जखमींना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी दोघांनाही तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी संजय महादेवराव गुगल, वय ४० वर्षे, रा. बहुजन चौक, शिवनगांव पुनर्वसन, सोनेगांव, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे पोउपनि. पंकज सयाम यांनी डोझीयर ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १८४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पोलीस ठाणे गणेशपेठ :–** दिनांक १९.०५.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, मध्यवर्ती बस स्थानक, गणेशपेठ समोरील एनएमसी बस थांबा येथे एक अनोळखी महीला वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाच्या बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी पोहवा. आतीष सोमेश्वर निकोडे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. अरूण पाटील यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) पोलीस ठाणे अंबाझरी :–** सौ. करीश्मा रिग्गी रंधई, वय २४ वर्षे, रा. आंबेडकर नगर, चंद्रमणी चौक जवळ, वाडी, नागपूर ह्या दिनांक १७.०२.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास आपले लहान मुलीसह पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन**– रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट १ इंच, केस– काळे लांब, डोळे– काळे, भाषा– हिंदी/मराठी बोलतात. **राक्षी वर्णन**– रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– मध्यम, उंची– ४ फुट १० इंच, केस– काळे लांब, अंगात– गुलाबी पांढरे ठिपके असलेला सलवार सुट घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे जुनी कामठी :–** श्रीमती आकांक्षा आनंद वारके, वय ५५ वर्षे व त्यांचा मुलगा नामे आयुष आनंद वारके, वय २२ वर्षे, दोन्हीही रा. न्यु खलाशी लाईन, कामठी, जि. नागपूर हे दोघे दिनांक ११.०५.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन श्रीमती आकांक्षा**– रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट २ इंच, केस– काळे पांढरे लांब, डोळे– काळे, अंगात– मेहरून रंगाची साडी व निळ्या रंगाचे ब्लाऊज घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी

बोलतात. **वर्णन आयुष**— रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे, अंगात— निळ्या रंगाचा टि—शर्ट व मेहरून रंगाचा फुलपॅन्ट घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** सौ. मंदा कांतीलाल रंगारी, वय ५६ वर्षे, रा. प्लॉट नं. ०२, चकोले ले—आऊट, जुना नरसाळा, नागपूर ह्या दिनांक १२.०५.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन**— रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, डोळे— काळे, अंगात— हिरवी पाने व लाल फुले असलेली साडी व लाल रंगाची स्लीपर घातलेले आहे. सोबत काळ्या रंगाची हॅण्डबॅग आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.


सौ. करीश्मा व त्यांची मुलगी


श्रीमती आकांक्षा व आयुष


सौ. मंदा

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३२२६/ २००७ | कलम ३८०, ४५४, ५११, ३४ भा.दं.वि. | विलास कृष्णराव कोटनाके, रा. अंबाझरी टेकडी, हनुमान मंदीर जवळ, अंबाझरी, नागपुर. | १८.०६.२०२६ |
| २. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१०५७८/ १९९९ | कलम ४०६, ४१०, ४६८, ४७१ भा.दं.वि. | निशांत अरविंद समर्थ, रा. पांढराबोडी पोलीस चौकी जवळ, अंबाझरी, नागपुर. | १७.०६.२०२६ |
| ३. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००९९०/ २०१४ | कलम ४, २५ भा.ह.का. | १) राकेश उर्फ छोटु महादेव रामटेके, रा. जय नगर, पांढराबोडी, बिटीबाई चे घराशेजारी, अंबाझरी, नागपुर. २) धिरज अलाप बांबोर्डे, रा. संजय नगर, पांढराबोडी, गजभिये चे घराजवळ, अंबाझरी, नागपुर. | २७.०७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**